दि.पंढरपूर अर्बन को–ऑप.बँक लि., पंढरपूर

प्रधान कार्यालय, ४१६३ ब, नवीपेठ,
पंढरपूर

ठेव धोरण

सन २०२६–२०२७

अ.नं.	तपशिल	पान नंबर
१	प्रस्तावना	१
२	आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठीचे ठेव धोरणामधील उद्दीष्टे	२
३	ठेवी प्रकार	३
	अ) बचतखाते	३
	ब) चालू ठेव खाते	५
	क) मुदत ठेवी व इतर ठेव खाती	६
४	खाते उघडण्याची पद्धत	६
५	अल्प बचत ठेव योजनेची माहिती	७
६	ठेवींचे व्याजदर ठरविण्याचा अधिकार	८
७	मुदत ठेवीवरील कर्जे	८
८	विमा संरक्षण	८
९	तक्रार आणि तक्रारीचे निवारण	८
१०	ग्राहकांच्या माहितीची गोपनियता	९
११	ठेवीबाबत व्यवहाराची कार्यपध्दती	९
	अ) नवीन ठेव खाते उघडणेबाबत	९
१२	संयुक्त खातेबाबत	९
	अ) वैयक्तीक खाती	९
	ब) ठेव खात्यासाठी संयुक्त खातेदाराचे नांव वाढविणे व कमी करणे	१०
१३	खातेचे सिग्नेटरीजबाबत	११
१४	वयोवृध्द, आजारी, अपंग आणि अंध व्यक्तींच्या खात्यावरील व्यवहार	११
१५	नामनिर्देशन सुविधा	१२
१६	ठेवींचे व्याजदर व व्याज आकारणी	१२
	अ) ठेवीचे व्याजदर	१२
	ब) शुन्य व्याजदराबाबत	१३
	क) व्याजातून आयकर कपात	१४
	ड) मुदतपुर्व ठेवींच्याबाबतीत	१४
	ई) मुदत पुर्व ठेवींचे पुर्नगुंतवणुकीबाबत	१४
१७	परिपक्व ठेवींच्याबाबतीत	१५
	१. परिपक्व ठेवींच्या(मुदत संपलेल्या) ठेवींचे नुतनीकरण होत असल्यास	१५
	२. इनफोर्समेंट ॲथोरिटीज यांनी गोठविली आहेत, त्यांचे नुतनीकरणाबाबत	१६
	३. मुदत ठेवी टेंडरसाठी/सिक्युरिटी म्हणून गर्व्हमेंट ॲथोरिटी यांचेकडे ठेवलेल्या ठेवी	१६
	४. परिपक्व ठेवींचे नुतनीकरण होत नसल्यास	१६
१८	डुप्लीकेट ठेव दाखला/पावती देणेचे अधिकार	१७
१९	वारस नोंद	१८
२०	निष्क्रिय (In-Operative) खात्यांचे बाबतीत	१८
२१	अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर	१९
२२	सर्व ठेवींची रक्कम मिळून ठेवीची रक्कम रोख अदा करणेबाबत	२०
२३	अंगठेधारक खातेदारांच्या व्यवहाराबाबत	२०
२४	स्थायी सूचना (Standing Instructions) बाबत	२०
२५	चेकबुक आकार	२१
	Annexure I-बेसीक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते	२२
	Annexure II-व्याजातून आयकर कपातीबाबत	२३
	Annexure-III Unclaimed Deposit	२४
	Annexure-VI CBS सिस्टीम मधून कायम ठेव, क्युम्युलिटीव्ह ठेव यांचे ॲटो रिन्युअल सुविधेबाबत	२७

-: दि.पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर :-

प्रधान कार्यालय, नवीपेठ, पंढरपूर

-: ठेव धोरण २०२६-२०२७ :-

चालू वर्षातील आर्थिक घडामोडीच्या तसेच बँकीग क्षेत्रातील महत्वाचे बदलाचा आणि बँकेच्या सध्याचा ठेवीचे व्याजदारानुसार, रक्कमेनुसार असणारी रचना, व्याजदर, ठेव संकलनाबाबत पुर्वीचा अनुभव व कार्यपद्धतीतील नेमकेपणा आणि ठराविक साचेबद्धता असणे आवश्यक आहे. त्यानुसार बँकांनी त्यांचे व्यवसायउद्दीष्ट साध्य करणेसाठी प्रतिवर्षी निश्चित धोरण ठरविणे अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी मा.संचालक मंडळाच्या दि.२८/०४/२०२६ च्या सभेमध्ये ठराव क्र.३५ नुसार खालीलप्रमाणे धोरण मंजूर केलेले आहे.

१) प्रस्तावना :-

बँकींग अधिनियमन कायदा १९४९ नुसार ग्राहकांना कर्ज देणे, ठेवी स्विकारणे व त्या ठेवींचे संरक्षण करणे हे बँकेचे मुख्य कार्य आहे. बँकींग व्यवसायात ठेवसंकलन हा एक आवश्यक घटक असून व्यवसायवृद्धीसाठी त्यास अनन्य साधारण महत्व आहे. बँकींगच्या मुळ संकल्पनेनुसार ग्राहकांकडून ठेव संकलित करून त्याचा विविध प्रकारची कर्जे वितरणासाठी विनियोग करणे आणि त्यामाध्यमातून नफा कमावणे हा मुख्य उद्देश आहे. बँकींग व्यवसायामध्ये ठेव आणि कर्ज व्यवहार अतिशय महत्व आहे. विशेषत्वाने ठेव संकलनाबाबत विशिष्ठ उद्देश, ध्येय आणि नियोजनाची गरज असते.बँकेच्या महत्वाच्या खर्चापैकी ठेवी वरील व्याजाचा खर्च प्रामुख्याने विचारात घ्यावा लागतो. त्यासाठी किती कालावधीच्या, किती व्याजदराच्या, किती रक्कमेचा, कोणत्या प्रकारच्या (वैयक्तिक आणि संस्थांच्या ठेवी) किती प्रमाणात स्वीकारावयाच्या याबाबतचे स्वतंत्र धोरण असणे गरजेचे आहे.

तसेच पुरेशी ठेव जमा करणे हे बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. मागील आर्थिक वर्षाअखेरील ठेवींचा खालीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

-: आर्थिक वर्ष २०२५ व २०२६ अखेरील ठेवीचा आढावा :-

(रक्कम रू.लाखात)

अ. नं.	तपशील	दि.३१/०३/२०२५	एकुण ठेवीशी प्रमाण (%)	दि.३१/०३/२०२६	एकुण ठेवीशी प्रमाण (%)	वाढ/घट
१	बचत ठेव	१९६५९.४७	१४.१३%	२२१७८.६६	१५.६४%	२५१९.१९०
२	चालू ठेव	४१३०.८३	२.९७%	४६८८.२५	३.३०%	५५७.४२०
३	इतर	११५३५७.२०	८२.९०%	११४९५४.९८	८१.०६%	-४०२.२२०
४	एकुण ठेवी	१३९१४७.५०	१००.००%	१४१८२१.८८	१००.००%	२६७४.३८०
५	सी.डी.रेशो		६५.८५%		७३.१४%	७.२९%

२) आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठीचे ठेव धोरणामधील उद्दिष्टे :-

चालू वर्षातील आर्थिक घडामोडींचा तसेच बँकींग क्षेत्रातील महत्वाच्या बदलांचा आणि बँकेच्या सध्याच्या ठेवींचे व्याजदरानुसार, रक्कमेनुसार असणारी रचना व व्याजदर तसेच, ठेव संकलनाबाबतचा पूर्वीचा अनुभव या सर्व बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे उद्दिष्ट ठेवून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ठेव धोरण तयार केलेले आहे.

१. बँकेच्या एकूण व्यवसाय वाढीच्या प्रमाणात (Growth) ठेव वाढीचे उद्दिष्ट ठरविणे.

२. ठेव उभारणीचा सरासरी दर (Cost of Deposit) किमान राखणे.

३. ठेवीचा मिक्सअप-कमी व्याजदराच्या ठेवी, बिनव्याजाच्या ठेवी आणि जास्त व्याजदराच्या ठेवी याचे प्रमाण ठरविणे.

४. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रचलित आदेश, परिपत्रके आणि सूचना यांचे पालन करणे. महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा, बँकिंग नियंत्रण कायदा, बँकेचे पोटनियम, बँकेचे ठेवी विषयक प्रचलित परिपत्रके व नियमांचे पालन करणे व पारदर्शकता आणणे.

५. सन २०२६-२०२७ मध्ये ठेवींच्या नवीन योजना आवश्यकतेनुसार ठरविणे.

६. बँकेमध्ये प्रचलित असणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यकतेनुसार योग्य बदल करणे आणि ॲसेट लाएबिलीटी मॅनेजमेंट मधील मिसमॅचनुसार ठेवींची मुदत व व्याजदराचा विचार करून नवीन ठेव योजना कार्यान्वित करणे.

३) ठेवींचे प्रकार :-

ग्राहकाचे दोन प्रकारामध्ये विभागणी करण्यात येईल. संस्था ग्राहक व वैयक्तीक ग्राहक.

- **संस्था ग्राहक :-** यामध्ये कोणत्याही प्रकारचे फर्म,भागदारी संस्था, प्रायव्हेट लिमीटेड किंवा पब्लिक लिमीडेट कंपनी/सहकारी संस्था/विश्वस्थ संस्था, हिंदु अविभक्त कुटुंब (एचयुएफ) असोसीएशन किंवा क्लब, अनरजिस्टर्ड फर्म व प्रचलित कायद्याने स्थापन झालेली कोणीतीही इतर संस्था.
- **वैयक्तिक ग्राहक :-** यामध्ये भारताचे नागरीक असलेले व्यक्ती,वैयक्तीक किंवा संयुक्तपणे. ग्राहकांना हवे असलेले आणि त्यांच्या व्यावसायिक स्थितीनुसार आपल्या बँकेने

लोकाभिमुख अशा ठेव योजना बँकेने त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्राहक नोकरीला असो किंवा त्याचा स्वत:चा व्यवसाय असो, त्यास एक मजबूत सहकारी बँक हवी असते. दि.पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि., पंढरपूर ही ग्राहकांसाठी अचूक निराकरण आहे. इतकेच नव्हे तर भविष्यासाठी ग्राहकांच्या बचतीमध्ये सुधारणा करेल अशा खालीलप्रमाणे ठेव योजना आपल्या बँकेने उपलब्ध करून दिल्या आहेत.

अ) बचत ठेव खाते :-

१) निवासी भारतीयांसाठी बचत खाते-

भारताचे नागरीक असलेल्या कोणत्याही सक्षम व्यक्तीस, व्यक्तीगत नावाने, संयुक्त नावाने सेव्हींग ठेव खाते उघडता येईल. अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी प्रतिबंधीत केलेले व्यक्ती, संस्था यांचे खाते उघडुन घेतले जाणार नाही. अज्ञान ग्राहकास पालनकर्ता म्हणुन नैसर्गिक पालक उदा.वडील किंवा आई यापैकी हयात नसल्यास कायद्याने नेमुन दिलेले पालक यांच्या नावाने सेव्हींग ठेव खाते उघडता येईल.

तसेच दहा वर्षापुर्ण वयाच्या व सही करता ग्राहकास बचतीची सवय लागावी या दृष्टीने स्वत:च्या नावाने सेव्हींग व रिकरींग खाते उघडता येईल. अशा खात्यास दि.२१/०४/२०२५ चे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सर्क्युलर नुसार ग्राहकाचे जोखीम व योग्यतेच्या धोरणावर आधारीत चेकबुक, एटीएम कार्ड देता येईल. या खात्यावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सुचने नुसार व्यवहार व शिल्लकीवर मर्यादा असणार आहे.

बचत ठेव खाते हे ग्राहकांना वेळोवेळी निधी जमा करणेसाठी, भविष्यासाठी बचतीची सवय अंगी लागावी यासाठी आहे. ग्राहकांचा व्यवसाय कोणताही असो अथवा खाजगी/सरकारी नोकरीला असो यांचेसाठी खालील प्रमाणे बचतठेव योजना उपलब्ध करून दिली आहे.

अ.नं.	खाते प्रकार	खाते उघडताना भरावी लागणारी रक्कम
१	नियमित बचतठेव खाते	रू.१००.००
२	बेसीक बचतठेव खाते	रू.१००.००

खाते उघडण्यासाठीचे आवश्यक रक्कम कमी करण्याचे अथवा झीरो बॅलन्स खाते उघडण्याच्या परवानगी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहिल.

बचत ठेव खातेदारांना मागणीनुसार विनाशुल्क डेबीटकार्ड लगेच उपलब्ध करून दिले जाते. तसेच ग्राहकांच्या मागणी नुसार विनामुल्य पासबुक, डिमांडड्राफ्ट सुविधा, सेफ डिपॉझीट लॉकर, नेफ्ट, आरटीजीएस इ.सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सेवाशुल्कच्या अधिक माहितीसाठी परिपत्रकाचा आणि त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांचा संदर्भ घेणेचा आहे.

वित्तीय समावेशन (Financial Inclusion) -

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार 'बेसीक सेव्हिंग बँक डिपॉझिट' खात्याची सुविधा देण्यात आली आहे. या खात्याची सविस्तर माहिती Annexure-I मध्ये देण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या परिपत्रका नुसार खालील यादीतील सोसायटी, ट्रस्ट, एसएचजी (बचत गट) यांचे सेव्हींग ठेव खाते उघडता येणार नाही.

Sr No	Name
1	Primary Co-operative Credit Society which is being financed by the bank.
2	Khadi and Village Industries Boards.
3	Agriculture Produce Market Committees.
4	Societies registered under the Societies Registration Act, 1860 or any other corresponding law in force in a State or a Union Territory except societies registered under the State Co-operative Societies Acts and specific state enactment creating Land Mortgage Banks.
5	Companies licensed by the Central Government under Section 8 of Companies Act, 2013 or Section 25 of Companies Act, 1956 or under the corresponding provision in the Indian Companies Act, 1913 and permitted not to add to their names the words 'Limited' or the words 'Private Limited'.
6	Institutions other than individuals, Karta of HUF and whose entire income is exempt from payment of income tax under the Income-tax Act, 1961.

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD HEAD OFFICE

7	Government departments/ bodies/ agencies in respect of grants/ subsidies released for implementation of various programmes/ Schemes sponsored by Central Government/ State Governments subject to production of an authorization from the respective Central/ State Government departments to open savings bank account.
8	Development of Women and Children in Rural Areas (DWCRA).
9	Self-Help Groups (SHGs), registered or unregistered, which are engaged in promoting savings habits among their members.
10	Farmers' Clubs – Vikas Volunteer Vahini – VV.

ब) चालू ठेव खाते–

वैयक्तीक ग्राहक व कोणत्याही प्रकारचे फर्म,भागदारी संस्था, प्रायव्हेट लिमीटेड किंवा पब्लिक लिमीडेट कंपनी/सहकारी संस्था/विश्वस्थ संस्था, हिंदु अविभक्त कुटुंब (एचयुएफ) असोसीएशन किंवा क्लब, अनरजिस्टर्ड फर्म व प्रचलित कायद्याने स्थापन झालेली कोणीतीही इतर संस्था यांना चालु ठेव खाते उघडता येईल. यात जास्तीत जास्त ग्राहक आकर्षित व्हावे म्हणुन काही सवलती देवू करून चालु खाते उघडता येईल. यास परवानगी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

काही खातेदांना आपण मोठे कर्ज दिले असल्याने आपल्या बँकेला इस्क्रो खाते उघडण्याची गरज असल्याने व यामुळे कासा डिपॉझिटमध्ये वाढ होण्याची शक्यता वाटत असल्याने बँकेला असे खाते उघडण्याची परवानगी देण्यात येत आहे. सदर खाते हे करारातील अटी व शर्ती याप्रमाणेच व्यवहार होतील. या खात्याच्या व्यवहाराची देखरेख संबंधीत शाखेचा शाखाधिकारी इस्क्रो एजंट म्हणुन जबाबदार असले, त्याच्या रजेच्या काळात शाखेतील दुय्यम अधिकारी हि जबाबदारी पार पाडेल.

ग्राहकांच्या सतत वाढत जाणाऱ्या व्यावसायिक गरजा पाहता आपल्या बँकेने ग्राहकांच्या व्यवसायाला अगदी साजेसा पर्याय खालीलप्रमाणे चालूठेव योजना उपलब्ध करून दिल्या आहेत.

अ.नं.	खाते प्रकार	आवश्यक शिल्लक
१	नियमित चालू ठेव खाते	१०००/–
२	सोसायटी चालू ठेव खाते	१०००/–

ग्राहकांना चालू ठेव खातेद्वारे धनादेश देता येतो, डिमांड ड्राफ्ट काढता येतो आणि रोख पैसे काढता येतात. शहराअंतर्गत सोयीस्कर व्यवहार करता येतात. CBS सुविधा असल्यामुळे कोणत्याही शाखेत चेकचे पेमेंन्ट ग्राहकांना उपलब्ध होऊ शकते. चालूठेव खातेच्या ग्राहकांना सेफ डिपॉझिट लॉकर, तसेच मुदत ठेवी योजनांचा लाभ घेता येतो. पेअेबल ॲट पार धनादेश व डेबीट

कार्डची सुविधा देखील उपलब्ध आहे. पासबुक व ई–मेल स्टेटमेंट ही सुविधा चालू ठेव खातेदारांना विनामुल्य उपलब्ध आहे. अधिक विस्तारीत माहिती लागू असलेल्या सेवा शुल्क परिपत्रकामध्ये दिलेली आहे.

क) मुदत ठेव व इतर ठेव खाती–

बँकेच्या मुदत ठेवीच्या असलेल्या स्कीममध्ये कोणत्याही वैयक्तीक व संस्था ग्राहकांना खाते उघडता येईल.

१) दीर्घकालीन गुंतवणूक आणि अधिक व्याज मिळविण्यासाठी ग्राहकांनी आपल्या बँकेत पैसे गुंतविण्यासाठी विविध नियमित मुदत ठेव योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. लवचिकता, सुरक्षितता आणि अधिक प्राप्ती देणाऱ्या मुदत ठेव योजना ही खास वैशिष्टे असून याचा लाभ व्यक्ती आणि संस्था घेत आहेत. कमीत कमी मुदत ठेव रक्कम खालीलप्रमाणे राहील.

अ.नं.	खाते प्रकाश	किमान शिल्लक
१	मुदत ठेव	१००/–
२	क्युम्युलिटीव्ह ठेव	१००/–
३	रिकरींग ठेव	१००/–

२) ठेवींचे आपोआप नूतनीकरण योजना (Auto Renewal Scheme) जुन्या विशेष योजना व्यतिरिक्त सरळव्याज पध्दतीच्या व चक्रवाढ व्याज पध्दतीच्या मुदत ठेवींचे (GL Type-24 & 32 साठी) नुतनीकरण मुदत संपल्यानंतर आपोआप पुर्वीच्या मुदत ठेव कालावधीने मुदत संपलेल्या तारखेस नूतनीकरण होणार आहे. त्याकालावधीसाठी असणाऱ्या व्याजदराने आपोआप नूतनीकरण केले जाईल.

४) खाते घडण्याची पद्धत :–

कोणतेही ठेव खाते उघडु इच्छीणाऱ्या व्यक्तीस/संस्थेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्गदर्शक तत्वानुसार केवायसी पॉलीसी अंतर्गत आवश्यक असणाऱ्या ओळखीचा व पत्ताचा पुरावा देणे बंधनकारक असेल. Money Circulation/ Multi Level Marketing/ Pyramid Structures अशा Activities मध्ये involve असणाऱ्या व्यक्तींचे किंवा संस्थेचे कोणत्याही प्रकारचे बचत, चालू व मुदत ठेव खाते उघडणेचे नाही.

१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार Money Circulation/Multi Level Marketing/Pyramid Structures अशा activities मध्ये involve असणाऱ्या व्यक्तींचे किंवा संस्थेचे कोणत्याही प्रकारच्या बचत/चालू/मुदत ठेव खाते उघडणेचे नाही.

२) मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या दि.१९/११/२०१५ रोजीच्या परिपत्रक क्र.RBI/2015-2016/236/DCBR.BPD.(PCB)Cir.No.8/16.20.000/2015-2016 नुसार को–

ऑपरेटीव्ह बँकांना काही अटींची पुर्तता केल्याशिवाय नॉन शेड्युल्ड सहकारी बँकांच्या ठेवी स्विकारता येणार नाही. सध्या बँकांकडे नॉन शेड्युल्ड बँकांच्या ठेवी निरंक आहेत.

३) खाते उघडताना इतर काणाच्या ओळखीची आवश्यक्ता असणार नाही. खाते घडण्यासाठी विविध नमुन्यातील छापील खाते उघडण्याचा अर्ज बँकेकडुन उपलब्ध करून दिला जाईल. सदर अर्ज पुर्ण भरून अर्जावर नमुद केलेले आवश्यक माहिती व नमुना सही देणे बंधनकारक असेल, तसेच खाते उघडण्यासाठीच्या फॉर्मवर खाते उघडण्यास आवश्यक असलेले कागदपत्रांची यादी देण्यात यावी. यादीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या ग्राहकाचे न उघडण्याचा अधिकार बँकेस राहिल.

४) मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या परीपत्रकाप्रमाणे बँकेने तयार केलेले केवायसी पॉलीसी नुसर ग्राहकांना त्यांच्या रिस्क नुसार ठराविक कालावधीनंतर केवायसी कागदपत्रे बँकेत जमा करावे लागतील.

५) अज्ञान खातेदारा बाबत तो सज्ञान होताच नवीन फोटो व नमुना सही घेतली जाईल.

६) निरक्षर व्यक्तीचे खाती :- निरक्षर व्यक्तीस बँकेत त्याच्या गरजेनुसार कोणतेही प्रकारचे खाते उघडता येईल. खाते उघडताना सही ऐवजी डाव्या/उजव्या हाताचा निशानी अंगठा, दस्तुर बँकेस मान्य असलेल्या व्यक्तीची ओळख देवून फोटो व केवायसी कागदपत्र पुर्तता करून खाते उघडता येईल. या ग्राहकास निशानी अंगठा बँकेच्या अधिकाऱ्या समक्ष खाते उघडण्याच्या फॉर्म वर उमटावा लागेल. त्याप्रमाणे खाते उघडते वेळी ओळख देणाऱ्या व्यक्तीस देखील खातेदारा समवेत समक्ष बँकेत यावे लागेल. अशा ग्राहकास बँकेचे अधिकारी वेळोवेळी आवश्यकते मार्गदर्शन करतील.

निरक्षर व्यक्तीचे अन्य साक्षर व्यक्ती बरोबर शक्यतो उघडण्यात येऊ नये. कारण त्या निरक्षर व्यक्तीचे फसवणुक होण्याची शक्यता असते. तथपी अपवादात्मक प्रसंगी पती/पत्नी किंवा जवळचे नातेवाईक यांचे नावाने संयुक्त खाते उघडता येईल. या खाते उघडते वेळी बँकेचे अधिकारी संबंधीत ग्राहकाला पुर्ण माहिती देतील. निरक्षर ग्राहकाने योग्य व कादेशीर पॉवर ॲटर्नी दिल्यास ॲटर्नीद्वारे खाते चालविण्याची परवानगी राहिल.

५) अल्पबचत ठेव योजनेची माहिती :-

१) अल्पबचत ठेव खाते हे खाते उघडले पासून जास्तीत जास्त ६ वर्ष मुदतीचे राहील.

२) खातेची रक्कम कमीत कमी रू.१०/- चे पटीत स्विकारणेत येईल.

३) अल्पबचत ठेव खाते बंद करताना जमा रक्कमेवर सेव्हींग ठेवीवर ऑन डेली प्रोडक्ट वेसीसने सेव्हींगला दिला जाणारा व्याजदर देणेत येईल.

४) खाते उघडलेपासून एकूण जमा रकमेच्या ८५% पर्यंत मा.संचालक मंडळ कर्ज व्याजदर वेळोवेळी ठरवेल त्या दराने टीडीआर कर्ज देणेत येईल.

५) अल्पबचत खातेस केवायसी घेणे गरजेचे आहे. (उदा.पॅन,आधार,मतदान कार्ड, रहिवासी पुरावा)

६) प्रत्येक अल्पबचत खातेदाराचे बँकेमध्ये सेव्हींग/करंट ठेव खाते असणे गरजेचे आहे म्हणजे केवायसी पुर्तता पुर्ण होईल/नॉमिनी लावता येईल व खाते बंद करताना खातेंची रक्कम ट्रान्सफर करूनच देणेत येईल.

७) अल्पबचत प्रतिनिधी यांचे दरमहाचे एकूण कलेक्शनवर २% इतके कमीशन दिले जाईल.

८) तसेच बँकेमध्ये मागील वर्षाचे सरासरी कमीशनचे १०% इतके रिकरिंग ठेव खाते काढणे व सदर रक्कम रिकरिंग मुदत पुर्ण झालेनंतर ठेव स्वरूपात बॅकेकडेच ठेवणे. अल्पबचत एजन्सी सोडलेनंतर बँकेचे अल्पबचत प्रतिनिधी यांचेकडे काही येणे-देणे नसल्यावरच सदर रक्कम परत करणेत येईल.

६) ठेवींचे व्याजदर ठरविण्याचा अधिकार :-

१. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे ठेवीवरील व्याजदर ठरविण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास आहे. सदरचे व्याजदर परिपत्रकाद्वारे शाखांना कळविले जातील आणि त्याची योग्य ती जाहीरात/प्रसिध्दी मुख्य कार्यालय-मार्केटिंग विभागामार्फत केली जाईल.

२. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे धोरणानुसार सेव्हींग ठेवीवर व्याजदर ठरविण्याचे अधिकार बँकेला दिले त्यानुसार संचालक मंडळ सेंव्हीग ठेवीचे व्याजदर ठरवून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

७) मुदत ठेवीवरील कर्जे :-

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा व बँकेचे कर्ज धोरणानुसार आवश्यक मार्जीन ठेवून मुदत ठेवीवर कर्ज देणेचे आहे. ठेवी वरील कर्जाचा व्याजदर मा.संचालक मंडळ वेळोवेळी दर ठरवेल, त्या प्रमाणे असेल.

८) विमा संरक्षण Deposits Insurance and Credit Guarantee Corporation (DICGC)-

बँकेचे सर्व ठेवींना DICGC अंतर्गत विमा संरक्षण आहे. (मर्यादा व अटी लागू) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दि.०४/०२/२०२० च्या परिपत्रकानुसार सर्व ठेवीदारांसाठी विमा संरक्षण मर्यादा (मुद्दल+व्याज रक्कमेसाठी) रू.५.०० लाख एवढी करणेत आलेली आहे. तसेच DICGC या संस्थेस ठेव विमा हप्त्याची रक्कमेची पावती सर्व शाखांच्या दर्शनी भागात नोटीस बोर्डवर लावणेसाठी देणेची आहे. विम्याविषयी माहिती सर्व ठेवीदारांना उपलब्ध करून देणेचे आहे.

९) तक्रार आणि तक्रारींचे निवारण-

बँकींग सेवेविषयी ठेवीदारांना असणाऱ्या तक्रारींचे निवारण बँकेने नियुक्त केलेले अधिकारी यांनी निर्धारित वेळेत करणेचे असून यासंबंधी माहिती शाखांनी नोटीस बोर्डवर लावणेची आहे. असंतुष्ट ठेवीदारास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी नियुक्त केलेल्या बँकींग लोकपालाकडे (Banking Ombudsman) जाण्याचा अधिकार राहील.

१०) ग्राहकांच्या माहितीची गोपनियता–

बँकेत ठेव खाते उघडतेवेळी ग्राहकांकडून घेतलेली माहिती गोपनीय ठेवण्यात येईल. त्याचा वापर अन्य संस्थासाठी बँकेच्या इतर सेवांसाठी केला जाणार नाही. संबंधित व्यवहाराशी असलेली बँकेची जोखीम विचारात घेवून आवश्यक तेवढी माहिती ग्राहकांकडून घेण्यात येईल. कोणत्याही प्रकारची अनावश्यक माहिती घेतली जाणार नाही. बँकेस आवश्यक वाटल्यास खाते उघडल्यानंतर ग्राहकाचे संमतीने स्वतंत्रपणे वेगळी माहिती मागविली जाईल.

११) ठेवीबाबत व्यवहाराची कार्यपध्दती–

अ) नवीन ठेव खाते उघडणेबाबत–

कोणत्याही प्रकारचे नवीन खाते उघडताना (Savings, Current, Term Deposit, CDR etc) खाते सुरू करणेसाठी सुरूवातीस खालीलप्रमाणे रक्कम रोखीने किंवा धनादेशाने स्विकारता येईल.

१) रोखीने (By cash)

वैयक्तीक बचत व मुदत ठेव खाते सुरू करणेसाठी आरंभिक रोख रक्कम रू.५०,०००/- च्या आत असल्यास पॅन व आधार कार्ड घेवून स्विकारता येईल व रू.५०,०००/- पेक्षा जास्त रोख रक्कम स्विकारता येणार नाही.

२) **धनादेशाने** (By Transfer/Clearing Cheque) वैयक्तीक किंवा गैरवैयक्तीक बचत, चालू किंवा मुदत ठेव खाते सुरू करणेसाठी आरंभिक रक्कम खाते उघडणाऱ्याच्या इतर बँकेच्या स्वतःचे खात्यामधील चेकने (Drawer & Payee) एकच असणे आवश्यक) असल्यास स्विकारता येईल.

१२) संयुक्त खातेबाबत :–

अ.वैयक्तिक (Individual) खाती –

कोणत्याही Individual चे संयुक्त खाते उघडताना जास्तीत जास्त ४ (चार) व्यक्तीचे खाते सुरू करता येईल. जर ४ पेक्षा जास्त व्यक्तींचे खाते सुरू करावयाचे असल्यास ठेव विभाग यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. केवायसी नियमाप्रमाणे प्रत्येक खातेदाराचे स्वतंत्र ओव्हीडी कागदपत्रे, फोटो देणे बंधनकारक राहिल.

संयुक्त नावावर सेव्हींग ठेव किंवा चालु ठेव खात उघडताना खात्यावर व्यवहार करणे संदर्भातील स्पष्ट लेखी सुचना खाते उघडते वेळी संबंधीत सर्व खातेदरांना देणे आवश्यक आहे. सदरची सुचना ग्राहकाच्या लेखी सुचनेनुसार बदलता येईल. संयुक्त खातेदारापैकी कोणीही मयत झाल्यास खात्यावरील व्यवहार स्थगीत ठेवण्यात येतील. अशा खात्यातील शिल्लक रक्कम काढण्यासाठी बँकेच्या नियमाप्रमाणे संबंधीत लाभार्थीने बँकेकडे रितसर अर्ज केल्यानंतर लाभार्थीला बँकेची पुर्ण कार्यावाही करून रक्कम दिली जाईल.

मुदत ठेव खाते जर Either or Survivor या सूचनेप्रमाणे उघडले असल्यास, मुदत संपल्यानंतर ठेवींची रक्कम परत करण्यासाठी सर्व ठेवीदारांच्या मंजुरीच्या स्वाक्षरीची आवश्यकता नाही. मात्र मुदतपूर्व ठेव रक्कम परत करण्यासाठी सर्व ठेवीदारांची मंजुरी/स्वाक्षरी घेणे आवश्यक राहील. मुदत ठेव खाते जर Former or Survivor या सूचनेप्रमाणे उघडले असल्यास, मुदत संपलेनंतर ठेवींची रक्कम परत करण्यासाठी फक्त Former ठेवीदारांची मंजुरी/स्वाक्षरी लागेल परंतु मुदत पूर्व ठेव मोडण्यासाठी सर्व ठेवीदारांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

Anyone or Survivor-(कोणीही किवा हयात असलेले) मुदत ठेव खाते जर दोन पेक्ष्या अधिक व्यक्तींच्या संयुक्त नावाने असेल उदाः अ, ब. क. तर अशा वेळी ठेवीची रक्कम व व्याज लागू होत असल्यास व्याजासह रक्कम, ठेवीची मुदत संपल्यानंतर ठेवीचे पेमेंट ज्या दिवशी केले जाईल त्या तारखेस, जर सर्व खातेदार हयात असतील तर कोणाही एका खातेदारास देता येईल. मात्र त्यावेळी एक किवा त्याहून अधिक खातेदार जर मयत झालेले असतील तर अशावेळी हयात असलेल्या कोणत्याही खातेदारास रक्कम देण्यात येईल. या बाबतीतच्या योग्य त्या सूचना खाते उघडतेवेळीच सर्व खातेदारांनी लेखी स्वरुपात बँकेकडे देणे आवश्यक राहील. मात्र ठेव मुदतपूर्व परत हवी असल्यास अथवा ठेवीच्या तारणावर कर्ज हवे असल्यास, सर्व ठेवीदारांच्या संमतीदर्शक सह्या विहित कागदपत्रावर लागतील.

ब. ठेव खात्यासाठी संयुक्त खातेदाराचे नाव वाढविणे व कमी करणे-

ठेव खात्यासाठी संयुक्त ठेवीदाराचे नाव वाढविणेचे असलेस तसेच कमी करणेचे असलेस खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे-

१. ठेव खातेदार / खातेदारांची लेखी संमती घेणे.

२. सर्व ग्राहकांची के.वाय.सी.कागदपत्रे घेणे.

३. नवीन ठेव पावती / पासबुक न देता किमान दोन अधिकृत अधिकाऱ्यांनी सध्याच्या ठेव पावती /पासबुकवर नाव वाढविणे / कमी करणेचे आहे.

४. संयुक्त ठेवीदाराचे नाव वाढविताना ३ (तीन) पेक्षा जास्त व्यक्ती होत नाहीत ना याची खात्री करणे.

५. संयुक्त मुदत ठेवीच्या संबंधीत मूळ ठेवीची रक्कम अथवा मुदत बदलता येणार नाही.

६. खाते उघडताना कोणत्याही प्रकारचे विचलन (Deviation)/अपवाद (Exception) असल्यास शाखेने शाखाधिकारी यांचे शिफारशीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरी घेणेची आहे.

१३) खातेचे Signatories सिग्नेटरीज बाबत :-

सर्व खातेंना Signature display साठी Customer ID चीच Signature घेणेची आहे. फक्त स्वतंत्र Signture Scan करणेची नाही.

१४) वयोवृध्द, आजारी, अपंग आणि अंध व्यक्तींच्या खात्यावरील व्यवहार :-

अंध ग्राहकास सुद्धा खाते उघडण्याचे केवायसी नियमानुसार सर्व प्रक्रिया पुर्ण करून सेव्हींग व मुदत ठेव खाते उघडता येईल. अशा ग्राहकांची फसवणुक होऊ नये म्हणुन संयुक्त खाते शक्यतो उघडण्यात येऊ नये. अपवादात्मक परीस्थितीमध्ये पती/पत्नी किंवा जवळचे नातेवाईक यांच्या संयुक्त खाते उघडता येईल. परंतु यावेळेस बँकेचे अधिकारी संबंधीत ग्राहकाला व्यवहाराबाबतची माहिती देतील.

प्रत्यक्ष बँकेमध्ये येवून विड्रॉलने रक्कम काढणे किंवा चेकवर सही करणे शक्य नसेल, परंतु निशाणी अंगठा उमटविण्या इतपत सक्षम असलेस किंवा प्रत्यक्ष बँकेत येणे, सही करणे आणि निशाणी अंगठा उठविणे यापैकी काहीही शक्य नसलेस, प्रत्यक्ष ग्राहकापर्यंत पोहचवून, हाताच्या किंवा पायाच्या निशाणी अंगठ्यासहीत दोन साक्षीदार पैकी एक जबाबदार बँक अधिकारी यांनी प्रमाणित केलेले दस्त ऐवज (चेक/विड्रॉवल इ.) यांचे आधारे रक्कम काढता येईल. अंध व्यक्ती करार करण्यास पात्र असल्याने त्यांना बँकींग सुविधेपासून वंचित ठेवले जावू नये असे रिझर्व्ह बँकेने

कळविले आहे. त्यामुळे अंधांना चेकबुक, एटीएम, लॉकर इ. सुविधा इतर सामान्य ग्राहकांप्रमाणेच देण्यात येतील, आवश्यक तेथे सेवकांनी मदत/सहकार्य करणेचे आहे.

१५) नामनिर्देशन (Nomination) सुविधा :-

प्रत्येक ठेव खातेसाठी व लॉकरसाठी ग्राहकांना चार व्यक्तींचे नॉमिनी म्हणून नॉमिनेशन करता येईल. जर ठेवीदारास ठेव खातेसाठी नॉमिनेशन करावयाचे नसेल तर तसे ठेवीदारांकडून ठेव खातेस नॉमिनी नोंद करणार नसलेबाबत स्वतंत्र लेखी पत्र घेणे आवश्यक असून शाखा व्यवस्थापकाचे त्या पत्रावर Approval असणे बंधनकारक आहे. नामनिर्देशन/रद्द केलेले नामनिर्देशन/बदल केलेले नामनिर्देशन यांच्या अंमलबजावणीमध्ये केवळ ठेवींच्या नुतनीकरणामुळे कोणतेही बदल होणार नाहीत. संयुक्त खातेदारांच्या ठेवींचे नामनिर्देशन रद्द करताना अथवा त्यामध्ये बदल करताना हयात असलेल्या सर्व खातेदारांची मंजुरी असणे गरजेचे आहे. जर नामनिर्देशित व्यक्ती (अल्पवयीन) अज्ञान असल्यास, ठेवींदारांनी नामनिर्देशन करताना अज्ञान व्यक्तीच्या वतीने रक्कम स्विकारण्यासाठी सज्ञान व्यक्तीची नेमणुक करावी.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्श सर्क्युलरप्रमाणे ग्राहक नॉमिनेशन देत असताना सक्सेशन व परसेंटेज या पद्धतीने एकपेक्षा जास्त व्यक्तीचे नॉमिनेशन करू शकेल. सक्सेशनमध्ये ग्राहक वारसाचा अनुक्रमांक ठरवुन देईल. त्याच प्रमाणे त्याच्या मृत्यु नंतर वारसाला रक्कम मिळेल. तसेच ग्राहकाने नॉमिनेशन देत असताना परसेंटेज दिले असेल तर त्या परसेंटेज प्रमाणेच नॉमिनेशन केलेल्या व्यक्तीला रक्कम मिळेल.

खातेदाराची रक्कम नामनिर्देशित व्यक्तीच्या नांवाने करत असताना मयत खातेदाराचे खाते बंद करून नामनिर्देशन व्यक्तीच्या नावाने खाते असल्यास त्या खात्यात किंवा नसल्यास नवीन खाते उघडुन त्या खात्यात रक्कम जमा करावी.

१६) ठेवींचे व्याजदर व व्याज आकारणी :-

अ) ठेवीचे व्याजदर :-

१. मुदत ठेवींचा किमान कालावधी ७ दिवस व त्यापासून पुढे असेल.

२. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे धोरणानुसार सेव्हिंग ठेवींवर व्याजदर ठरविण्याचे अधिकार बँकेला दिले आहेत ते ठरविताना रू.१.०० लाखांपर्यंत सर्वांना Uniform व्याजदर व रू.१.००

लाखावरती Differential व्याजदर बँक देऊ शकते. त्याबाबतचा योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

३.सेवकांना, माजी सेवकांना बचत ठेव, मुदत ठेव यावर अतिरिक्त १% जास्त व्याजदर दिला जाईल. ठेव रक्कम जर कायम, एकत्रित पगारावरील सेवक व माजी सेवकांच्या वैयक्तीक किंवा कुटुंबातील व्यक्ती व सेवक यांच्या संयुक्त स्वरूपाची असेल तर अतिरिक्त व्याज दिले जाईल.

४.रविवार किंवा Non Business Working Day या दिवशी मुदत संपणाऱ्या ठेवींवर पुढच्या Working Day पर्यंत मूलतः करार झालेल्या व्याजदराने खालीलप्रमाणे व्याज देण्यात यावे.

१) सरळव्याज पध्दतीच्या ठेवींसाठी मूळ मुद्दल रकमेवर ३६५ दिवसाप्रमाणे.

२) पुर्नगुंतवणूक व रिकरिंग ठेवींसाठी शिल्लक रकमेवर.

५.बचत ठेव खाते निष्क्रिय असले तर व्याज दिले जाईल. मुदत ठेव खात्यांची मुदत संपली असल्यास, अशा खात्यांना बचत ठेवीच्या व्याजदराने व्याज दिले जाईल. पिग्मी ठेव खाते निष्क्रिय असले तरी पिग्मी ठेव खात्यास लागू असणाऱ्या व्याजदराप्रमाणे व्याज अदा करण्यात येईल.

६.सेव्हिंग्ज ठेव खात्याची व्याज आकारणी दैनंदिन शिल्लक रकमेवर करणेत येईल. सदर व्याज सहामाही (सप्टेंबर/मार्च) मध्ये दिले जाईल. व्याज आकारणी तारीख बँकेचे सोईने ठरवली जाईल.

७.CDR व्याज आकारणी ही Quarterly Compounding on Base Amount + Interest Payable Amount वरती केली जाईल.

८.मुदत ठेवीची व्याज आकारणी मासिक, तिमाही, पुर्नगुंतवणूक या पध्दतीने केली जाईल. ज्या मुदत ठेवी दिवसांवरती (Days) केलेल्या आहेत त्याचे व्याज सहामाही अखेर एकूण होणाऱ्या दिवसांवर (Days) काढले जाईल व ज्या मुदत ठेवी मासिक/वार्षिक पध्दतीने उघडलेल्या आहेत त्याचे व्याज मासिक पध्दतीने जमा होईल.

९.चालू ठेवी वगळता सर्व ठेवींवर व्याज देणेचे आहे.

१०.ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवींवर ०.५०% इतके अतिरिक्त व्याज देण्यात येईल.

ब) शून्य व्याजदराबाबत (Zero Interest Rate) :-

१.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार १० वर्षे किंवा १० वर्षे कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता Inoperative असणारी खाती ज्यांची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग केलेली आहे. सदर खातेस व्याज आकारणी होणार नाही.

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

२.ज्या खातेदाराने सेव्हिंग ठेव किंवा मुदत ठेवीसाठी विनंती अर्जानूसार व्याजदर न आकारणेबाबत लेखी सूचना दिली असल्यास अशा खात्यांना ०% व्याजदर लागू राहील.

क) व्याजातून आयकर कपात :-

याबाबतची स्वतंत्र नियमावली केलेली असून ती सोबत Annexure-II मध्ये दिलेली आहे.

ड) मुदतपूर्व ठेवींच्याबाबतीत :-

१. सरळ व्याज पध्दतीच्या मुदत ठेवीचे मुदतपूर्व वितरण करताना १४ दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी व्याज अदा करू नये व १४ दिवसानंतर मुदतपूर्व वितरण करताना पुर्ण झालेल्या कालावधीकरीता लागू असलेल्या व्याजदरातून अथवा करार झालेला व्याजदर यापैकी कमी असलेल्या व्याजदरातून १% दंडव्याज कपात करून सरळव्याज पध्दतीने व्याज आकारणी करावी.

२. सीडीआर व कायम ठेवी मुदतपूर्व वितरण करताना १४ दिवसापेक्षा कमी कालावधीसाठी व्याज अदा करू नये व १४ दिवस पुर्ण झालेस मुदतपूर्व वितरण करताना पुर्ण झालेल्या कालावधीकरीता लागू असलेल्या व्याजदरातून अथवा करार झालेला व्याजदर यापैकी कमी असलेल्या व्याजदरातून १% दंडव्याज कपात करून व्याज आकारणी करावी.

३. पतसंस्था व Card Rate नुसार घेतलेल्या ठेवी ठेवलेपासून १४ दिवस पुर्ण न झाल्यास मुदतपूर्व वितरण करताना व्याज अदा केले जाणार नाही. तसेच ठेव ठेवलेपासून १४ दिवस पुर्ण झालेस पुर्ण झालेल्या मुदतीसाठी लागू असलेल्या व्याजातून १% दंडव्याज कपात करून व्याज आकारणी करावी.

४. मुदतपूर्व ठेव मोडताना वरीलप्रमाणे दंडव्याज व्यतिरिक्त इतर कोणताही दंड आकारला जावू नये.

इ) मुदत पुर्व ठेवींचे पुर्नगुंतवणूकीबाबत :- बँकेतील कोणत्याही प्रकारची मुदत ठेव/सीडीआर इ. मुदतपूर्व परत घेवून पुन:श्च अन्य कोणत्याही ठेव प्रकारात गुंतवण्यात येत असेल तर, दंडव्याजाची आकारणी केली जाणार नाही. मात्र अशा प्रकारे नवीन केलेल्या गुंतवणूकीची मुदत संपण्याची तारीख मूळ केलेल्या गुंतवणूकीच्या मुदत संपण्याच्या तारखेपेक्षा जास्त राहील.

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

१७) परिपक्व ठेवींच्याबाबतीत :-

१) परिपक्व ठेवीच्या (मुदत संपलेल्या) ठेवींचे नुतनीकरण होत असल्यास –

(अ) ज्या ठेवी ॲटो रिन्युअल होणार नाहीत, अशा ठेवी १४ दिवसांपर्यंत ग्राहकांनी नुतनीकरणासाठी सादर केलेल्या ठेव पावत्यांचे As of Renewal होईल.

(ब) ज्या ठेवी ॲटो रिन्युअल होणार नाहीत, अशा ठेवी १४ दिवसानंतर–नुतनीकरणासाठी ज्या दिवशी ठेव पावती सादर करण्यात येईल, त्या दिवशीचा ज्या कालावधीसाठी मुदत ठेव नुतनीकरण करणार आहे त्या व्याजदराने ठेव पावतीचे नूतनीकरण होईल. पावतीची मुदत संपलेली तारीख व नुतनीकरणाची तारीख यामधील कालावधीचे व्याज बचत खात्याला लागू असणाऱ्या व्याजदराने देण्यात येईल.

(क) ज्या ठेवी ॲटो रिनीव्हल होणार आहे. मुदत संपलेली ठेवीचे सिस्टीममधुन डे–स्टार्टच्या वेळी ॲटो रिनीव्हल होतील. यामध्ये जुन्या विशिष्ट स्कीम मधील ठेवी ॲटो रिनीव्हल होणार नाहीत.

पिग्मी ठेव खाते नुतनीकरण करता येणार नाही. मुदती नंतर ग्राहकांना नवीन पिग्मी खाते उघडावे लागेल.

ज्या मुदत ठेवींची मुदत संपून १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता झालेली आहे. (Unclaimed Deposit) अशा ठेवींच्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग कराव्या लागतात अशा ठेवींसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार ठेव पावती नुतनीकरणासाठी सादर केलेल्या तारखेपर्यंत व्याज रक्कम अदा करून ठेव पावती सादर केलेल्या तारखेपासून नुतनीकरण केली जाईल म्हणजेच मुदत ठेवीचे मुदत संपलेल्या तारखेपासून नुतनीकरण (As of Renewal of Deposit) होणार नाही.

या ठेवी बँकेकडे असेपर्यंतच्या कालावधीसाठी बँकेच्या बचत खात्याचा व्याजदर लागू होईल व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे वर्ग केल्यानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेला व्याजदर लागू होईल.

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

२) जी मुदत ठेव खाती इनफोर्समेंट ॲथोरिटीज यांनी गोठविली (Frozen) आहेत त्यांचे नुतनीकरणाबाबतीत खालीलप्रमाणे धोरण राहील–

- संबंधीत खातेदाराने जर बँकेत मुदत ठेव नुतनीकरणासाठी विनंती अर्ज मुदत संपलेल्या तारखेपासून १४ दिवसांचे आत दिला असेल तर मुदत संपलेल्या तारखेपासून (As of date) प्रचलीत असणाऱ्या व्याजदराने मुदत ठेवीचे नुतनीकरण करता येईल, तसेच जर खातेदाराने मुदत ठेव नुतनीकरणासाठी विनंती अर्ज मुदत संपलेल्या तारखेपासून १४ दिवसानंतर दिला असल्यास नुतनीकरणासाठी ज्या दिवशी अर्ज सादर करण्यात येईल, त्या दिवशीचा मुदत संपलेल्या तारखेपासून झालेल्या दिवसांकरीता असणारा प्रचलीत व्याजदरानुसार किंवा जर मुदत ठेवीची मुदत संपून १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संपलेली असलेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सुचनेनुसार सरळ व्याज पध्दतीने व्याज रक्कमेसह मुदत ठेव पावती अर्ज सादर केलेल्या तारखेपासून प्रचलित व्याजदराने नुतनीकरण केले जाईल.
- वरीलप्रमाणे नुतनीकरण केलेल्या मुदत ठेव खातेची नवीन ठेव पावती इश्यू करणेची नाही. जुन्या ठेव पावतीवर नुतनीकरण करून देवून अकौंट ओपन फॉर्मवरती नुतनीकरणाची नोंद करणे.

३) ज्या मुदत ठेवी टेंडरसाठी/सिक्युरिटी म्हणून कॉन्ट्रक्टर यांनी गव्हर्मेंट ॲथोरिटी यांचेकडे मूळ मुदत ठेव पावती दिलेली असेल व अशा ठेवींची मुदत संपलेनंतर नूतनीकरण करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे.

- संबंधित मुदत ठेव पावतीचे नूतनीकरण करणेसाठी संबंधित गव्हर्मेंट ॲथोरिटी यांचेकडून सदरची पावती नूतनीकरण करणेसाठी लेखी सही शिक्यासह संमती (Request Letter) घेणे.

४) परिपक्व ठेवींचे नुतनीकरण होत नसल्यासः–

परिपक्व ठेवींचे नूतनीकरण न केल यास, सरळ व्याजाच्या मुदत ठेवींचे मुद्दल रक्कमेवर (Principle Amount) व क्युम्युलिटीव्ह ठेवींचे देय रकमेवर (Maturity Amount) सेव्हिंग्ज ठेव

व्याजदराने झालेला कालावधीकरीता व्याज अदा करावे. पिग्मी ठेवी परिपक्व झाल्यास ठेवीच्या मुदतीनुसार लागू असणाऱ्या व्याजदराने झालेल्या कालावधीकरीता व्याज अदा करावे.

१८) डुप्लीकेट ठेव दाखला/पावती देणेचे अधिकार :-

ठेव पावती गहाळ झाल्यानंतर, सदर ग्राहकाने डुप्लीकेट ठेव पावती मिळण्याबाबतच्या केलेल्या अर्जानुसार शाखाधिकारी व अन्य एक अधिकारी यांच्या संयुक्त सहीने डुप्लीकेट ठेव पावती देणेचे अधिकार राहील.

१९) वारस नोंद :-

वारस नोंदीकरीता बँकेचे वारस धोरणाचा संदर्भ घ्यावा. सामान्यपणे खालील प्रमाणे वारस नोंदीचे प्रक्रिया पार पाडली जाईल.

१) कायदेशीर सुविधा उपलब्ध आहे. केंद्र सरकारने २०२४ च्या बँकिग कायद्यांमध्ये सुधारणा करण्याच्या कायद्याला मंजुरी दिली आहे, ज्यामुळे बँक खात्यांच्या धारकांना एकाऐवजी जास्तीत जास्त चार व्यक्तींची नियुक्ती नॉमिनी म्हणुन करता येईल. बँकेचे अधिकारी खाते उघडतांना खातेदारास नॉमिनी नेमण्याचा आग्रह करतील. अज्ञानास नॉमिनी म्हणून नेमता येईल. मात्र ज्या खातेदारांना नॉमिनी नेमून देण्याची इच्छा नसेल, त्यांनी तसे लेखी बँकेस कळिवणे आवश्यक राहील.

२) ज्या ठेव खात्यास नॉमिनी नेमून दिलेला असेल, अशा बाबतील खातेदाराचे निधन झाल्यास खात्यावरील शिल्लक रक्कम, व्याज लागू झाल्यास व्याजासह, खातेदाराच्या कायदेशीर वारसांच्या वतीने विश्वस्त म्हणून खातेदाराने आपल्या हयातीत नेमलेल्या नॉमिनीस देण्यात येईल.

३) खातेदारास आपल्या हयातीत केव्हाही लेखी सूचना देवून नॉमिनी रद्द करता येईल वा बदलून दुसरा नॉमिनी देता येईल.

१०) वारस नोंद असताना मुळ डीपॉझीटर मयत झाल्यास वारसास करावयाच्या पूर्तता :

१) वारसाने एक अर्ज करणेचा

२) त्यासोबत डीपॉझीटर मयत झालेचा मयत दाखला मुळ प्रत देणेची.

३) वारसाचे गरजेनुसार सदर खाते सेव्हींग असलेस ते खाते बंद करून नवे खाते उघडले जाईल. संगणक प्रणालीत तेच खाते पुढे चालू ठेवणेची सोय नसलेने नवे खाते उघडणेचे. जर जुन्या अकौंट चा नंबर समजा 'गॅस सबसिडी इ.सी.एस.' स्टॅन्डिंग इन्स्ट्रक्शनअशा काही व्यवहारासाठी तर असे सर्व व्यवहार नवीन अकौंटला बदलून घेणेची जबाबदारी अशा नॉमिनीची राहील.

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD. HEAD OFFICE

४) नॉमीनी म्हणून पूर्तता करीत असतानाच अन्य वारसांची हरकत आल्यास ती हरकत एकतर नॉमिनीने दूर करून देणेची आहे. अन्यथा मे. सक्षम कोर्ट यांचेकडून सक्सेशन सर्टिफिकेट आणणे आवश्यक राहील व त्यानुसारच निर्णय होईल.

५) यानुसार शाखाधिकारी यांचे अधिकारात हा बदल करणेचा आहे.

२०) निष्क्रिय (In-Operative/Dormant) खात्यांचेबाबतीत :-

१) ज्या सेव्हिंग्ज किंवा चालू ठेव खाते मध्ये २ वर्षे ग्राहकाने केलेले (Customer Induced) अथवा इतर व्यक्तीने ग्राहकांच्या खात्यावर केलेले (Third Party Induced) (Debit/Credit) व्यवहार झालेले नाहीत, अशा खात्यांना In-Operative समजली जातील व CBS मध्ये अशा खात्यांना In-Operative मार्कींग केले जाईल.

उदा-

Particular Example	Customer Induced Cash withdrawal or Deposit, Interest on FD Crediting to Saving A/c as per mandatet
Third Party Induced	Amount Deposited By Third Party In Account
Customer Not Induced	Bank Charges, Interest Crediit.

- निष्क्रिय खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.
- निष्क्रिय खात्याच्या खातेदाकडून योग्य प्रतिक्रिया मिळाल्यास असे खाते आणखी १ वर्ष सक्रीय म्हणून गृहीत धरावे.

२) In-Operative खाते Operative करणेचे अधिकार शाखाधिकारी/ऑफीसर यांना राहतील. खाते Operative करताना In-Operative होण्याचे कारणाबाबत शाखाधिकारी/ऑफीसर यांनी माहिती घेऊन त्याप्रमाणे ग्राहकांचा अर्ज घेतले नंतर KYC संबंधी पुर्तता करून खाते Operative करणेचे आहे.

तसेच ज्या सेव्हिंग्ज किंवा चालू खात्यामध्ये १ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता व्यवहार नाहीत. त्या खातेदारांशी जास्तीत जास्त संपर्क साधून त्यांच्या व्यवहार न करण्याच्या अडचणी समजून घेवून खात्यामध्ये व्यवहार करण्यासाठी प्रवृत्त करावे.

संबंधित खातेदाराशी संपर्क साधल्याची तारीख, खातेदाराचे मिळालेले उत्तर अथवा संपर्क न झाल्यास त्या संबंधीची माहिती यांची शाखांनी (Excel Sheet) रजिस्टरमध्ये नोंद ठेवावी.

३) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे DEAF मध्ये पाठविण्यात येणाऱ्या Unclaimed खात्यांच्याबाबतीत:- याबाबतची कार्यवाही Annexure-III प्रमाणे करणेची आहे.

४) सर्व प्रकारच्या ठेव (Savings Account, Current Account, Term Deposit, CTD, etc.) खातेंसाठी कालावधी खालीलप्रमाणे राहतील.

- Inoperative/Dormant Period-Savings & Current खात्यांसाठी सदरचा कालावधी हा ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून (Customer induced transaction) २ वर्षे राहील म्हणजेच ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून २ वर्षानंतर सदरचे खाते In-operative/Dormant ठरविले जाईल.
- तसेच मुदत ठेव व CDR ठेवीसाठी खात्याची मुदत संपलेनंतर २ वर्षानंतर सदर खाते Inoperative/Dormant ठरविले जाईल. Unclaimed Period-Savings व Current खातेंसाठी सदरचा कालावधी हा ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून (Customer induced transaction) १० वर्षे राहील म्हणजेच ग्राहकाने केलेल्या शेवटच्या व्यवहार तारखेपासून १० वर्षानंतर सदरचे खाते Unclaimed ठरविले जाईल. तसेच मुदत ठेव, CDR ठेवीसाठी खात्याची मुदत संपलेनंतर १० वर्षे राहील.

२१) अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर-

१) अज्ञान ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर, ठेवीदाराने Re-KYC ची पूर्तता करेपर्यंत खात्यांचे Debit Transaction Freeze करण्यात येतील. तसेच खात्यावरील शिल्लक रक्कमेची खात्री केल्या संबंधितील पत्र शाखेने ठेवीदारांकडून घ्यावे.

२) Basic Saving Account मधील ठेवीदार सज्ञान झाल्यानंतर या कॅटेगरीमधील त्यांचे खाते बंद करण्यात येईल व के.वाय.सी. ची पुर्तता करून सर्वसाधारण बचत खाते उघडण्यात येईल.

THE PANDHARPUR URBAN CO. HEAD OFFICE LTD.

२२) सर्व ठेवींची रक्कम मिळून ठेवीची रक्कम रोख अदा करणेबाबत –

१) रक्कम अदा करताना, जर बचत व चालूठेव वगळता खातेदारांची संबंधित दिवसाची शिल्लक रक्कम रू.२०,०००/– व रू.२०,०००/– पेक्षा जास्त असेल, तर खातेदारास रोख स्वरूपात रक्कम अदा करता येणार नाही. (उदा–खातेदारांची एकूण ठेव रू.५०,०००/– आहे. परिपक्व ठेव व त्यावरील देय व्याज, देय रक्कम रू.५,०००/– इतकी आहे. तरीही खातेदाराला रोख स्वरूपात रक्कम अदा करता येणार नाही.)

२) संबंधित दिवसाची बचत व चालू ठेव वगळता शिल्लक रक्कम रू.२०,०००/– पेक्षा कमी असेल तर खातेदारास रोख स्वरूपात रक्कम अदा करता येईल.

२३) अंगठेधारक खातेदारांच्या व्यवहाराबाबत:–

अंगठेधारक खातेदारांची चालू ठेव खाती उघडणेची नाहीत. अशा खातेदारांच्या सेव्हिंग्ज खात्याला एटीएमची सोय उपलब्ध होणार नाही. खातेदारास रक्कम अदा करताना खातेदाराचे पासबुक तसेच ओळखपत्र तपासूनच रक्कम अदा करणेची आहे. खातेदारा व्यतिरिक्त (Third Party Payment) विड्रॉल स्लिपने रक्कम अदा करू नये. मात्र अपवादात्मक परिस्थितीत शाखेच्या सेवकांनी (Officer, Asst. Manager, Manager) यांनी जर अंगठा बांधून दिलेला असेल तर अदा करता येते.

२४) स्थायी सूचना (Standing Instructions) बाबत –

ज्या ग्राहकांनी त्यांचे रिकरींग खातेची तसेच कर्ज खात्याची रक्कम त्यांचे SA/CA/CC मधून वर्ग करणेस सांगितले आहे. अशा रक्कमा शाखेकडून Manually चलन करून सदर खाती जमा केले जात आहेत. याबाबत CBS प्रणाली मधील Standing Instructions या Option मध्ये योग्य ती माहिती भरल्यास सदर माहितीप्रमाणे रक्कम ग्राहकाचे कर्ज खाते तसेच रिकरींग खाती जमा होईल. याबाबत खातेदाराकडून फॉर्म भरून घ्यावयाचा असून त्याचा नमुना सोबत जोडलेला आहे.

२५) चेकबुक आकार !-

खातेदारास नवीन खाते उघडतेवेळी चेकबुकची आवश्यकता असलेस लगेच चेकबुक मिळेल, बचत खात्यासाठी, चालू ठेव खात्यास व कॅशक्रेडीट खात्यास चेकबुक चार्जेसची आकारणी केली जाईल. सविस्तर माहिती सेवा शुल्काच्या परिपत्रकामध्ये दिलेली आहे.

प्रचलित पध्दतीनुसार वैयक्तिक खातेदाराचे चेकबुक व खातेदाराचे नाव लिहून मल्टीसिटी/पेअेबल अॅट पार चेक देण्यात येईल, चेकबुक चार्जेस ठरवणेचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील. चेकबुकबाबत सवलत देण्याचे अधिकार शाखाधिकारी यांचे शिफारशीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

वरीलप्रमाणे दहा वर्ष व दहा वर्षावरील Unclaimed Deposit बाबतची कार्यवाही करणेत येईल.

दिनांक :

मुख्य कार्यकारी अधिकारी

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD. HEAD OFFICE

-: Annexure I-बेसीक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते :-

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार "बेसीक सेव्हिंग बँक डिपॉझिट" खात्यांना खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येतील.

१. बेसीक सेव्हिंग बँक खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध राहिल. सध्या आपण यामध्ये १८ वय वर्षा खालील ग्राहकांचे खाते उघडत आहे.

२. सदर खाते उघडताना कमीत कमी शिल्लक रक्कमेची अट राहणार नाही.

३. विनाशुल्क सेवा–

- आपल्या बँकेच्या ATM द्वारे पैसे काढणे. (As per Specified Limit)
- Local Clearing चेक्स जमा करणेसाठी कोणत्याही प्रकारचे चार्जेस राहणार नाहीत.
- सदर खात्यावरील चेक रिटर्न आल्यास सदर खात्यास चेक रिटर्न चार्जेस राहणार नाहीत.

४. रक्कम भरणे व काढणेबाबत–

१. सदर खात्यात एका महिन्यात जास्तीत जास्त रू.१०,०००/– पर्यंत रक्कम नावे देता येईल व एका आर्थिक वर्षात रू.१,००,०००/–पर्यंत रक्कम जमा घेता येईल.

२. Specified Limit-सदर खात्यातून एका महिन्यात जास्तीत जास्त ४ वेळा रक्कम (ATM/RTGS/NEFT/Clearing/ शाखेतून रोख कॅश काढणे/Transfer/Standing Instruction/EMI अशा एकत्रीत स्वरूपात) विनाशुल्क काढता येतील.

३. DEPOSIT- Small Deposit account नियमाप्रमाणे खात्यामध्ये जास्तीत जास्त शिल्लक रक्कम रू.५०,०००/– पर्यंत ठेवता येईल. सदर Deposit ठेवताना Savings ठेव Balance व Deposit Balance रू. १,००,०००/– चे वर जाणार नाही याची काळजी घ्यावी.

४. सदर खातेदारास त्याचे मुदत ठेव, स्वल्पसंचय ठेव, सोनेतारणावर जास्तीत जास्त रू.५०,०००/– कर्ज देता येईल.

५. चेकबुक–सदर खात्यावर फक्त Withdrawal व ATM द्वारे व्यवहार करता येतील. सदर खातेदारांना चेकबुकची सुविधा देता येणार नाही.

६. सदर खातेदारास सर्व शाखा मिळून (Bank as whole) फक्त एकच सेव्हिंग्ज खाते उघडता येईल.

७. ज्या ग्राहकांची अशी खाती उघडली आहेत. त्यांची दुसरी बचत खाती आपल्या बँकेत असू नयेत. जर अशा ग्राहकांची एकापेक्षा जास्त बचत खाती आपल्या बँकेत असतील तर त्यांनी ती Basic Savings Bank Deposit Account उघडल्यापासून ३० दिवसाच्या आत बंद करावयाची आहे. Basic Savings Bank Deposit Account ओपन करताना खातेदाराची के.वाय.सी. पूर्तता करणेची आहे.

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

Annexure II-व्याजातून आयकर कपातीबाबत

आयकर विभागास पाठविण्यात येणाऱ्या Form-15G/15H च्या ऐवजी वापरण्यात यावा. आयकर कपात होऊ नये म्हणून घेतलेल्या नवीन Forms 121 बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे.

१. जेष्ठ नागरीक ठेवीदार (संबंधीत चालू वर्षी वय वर्षे ६० किंवा अधिक असेल असा ठेवीदार)- Forms 121 साठी पात्रता - Forms 121 हे निवेदन पत्र देणाऱ्या वरीष्ठ नागरिक ठेवीदाराचे संबंधीत चालू वर्षीचे एकूण उत्पन्नावर करदेयता (Tax Liability) निरंक (NIL) असेल किंवा त्यांचे एकुण उत्पन्न रु.१२,००,०००/- च्या आत आहे अशी निवेदन पत्र देणाऱ्या ठेवीदाराने स्वत:ची खात्री केली पाहिजे.

२. इतर ठेवीदार-Form 121 साठी पात्रता-Form 121 हे निवेदनपत्र देणाऱ्या ठेवीदाराचे संबंधीत चालू वर्षाचे सर्व मार्गाने मिळणारे करपात्र उत्पन्न रु.१२,००,०००/- पेक्षा कमी. वैयक्तीक ठेवीदार, ज्येष्ठ नागरीक HUF व Trust यांना Form 121 देता येईल.

३. Form 121मधील अटींचे महत्त्व/गांभीर्य याची खातेदारास जाणीव करून देणे. शाखाधिकारी यांनी वरील अटी पूर्ण होतात का याची ठेवीदारांशी चर्चा/रूजवात/खात्री करावी तसेच Form 121 निवेदनपत्र असत्य ठरल्यास किमान ३ महिने कारावास होणेची शिक्षा कायद्यात आहे. याची जाणीव ठेवीदारास करून द्यावी.

४. Form 121आयकर खात्याकडे पाठवणे. हे निवेदनपत्र ठेव स्वीकारताना किंवा दरवर्षी घेतले जाते. तसेच नवीन मुदतठेव पावती करताना ठेवीदारांच्या उत्पन्नामध्ये बदल होत असलेस, वाढीव उत्पन्नासाठी नवीन Form 121घेणेचा आहे. तरी शाखेमध्ये ज्या महिन्यात Form 121 निवेदनपत्र जमा होतील ते मुख्य कार्यालयाकडून दिलेल्या Excel Format मध्ये माहिती भरून सॉफ्ट कॉपी पाठविणेची आहे. त्यानंतर दर तिमाहीला मुख्य कार्यालय मार्फत प्राप्त झालेल्या सर्व माहितीचे एकत्रिकरण करून ऑनलाईन अपलोड केले जाईल.

५. Form 121 दिला नसेल तर पूर्तता व कार्यवाही. ज्या ठेवीदारांकडून Form 121 निवेदनपत्र मिळालेले नसेल तर ज्येष्ठ नागरीकांना द्यावयाच्या व्याजाची एका वर्षात रक्कम रू.१,००,०००/- पेक्षा जास्त होणार असेल आणि वैयक्तीक व इतर ठेवीदारांना द्यावयाच्या व्याजाची १ वर्षाची रक्कम रू.५०,०००/- जास्त होणार असेल तर नियमानुसार आयकर कपात करावी. त्याचप्रमाणे आयकर कपात करून पुढील महिन्याच्या ५ तारखेच्या आत रक्कम संबंधीत TDS Payable A/c ला जमा करावी.

६. Form 121 दाखल करणेसाठी PAN आवश्यक-दि.०१/०४/२०१० पासुन PAN नंबर अनिवार्य असलेची तरतुद कायद्यात केली आहे. त्यामुळे PAN क्रमांक नसेल तर सदर निवेदनपत्रे स्विकारू नयेत. अशा बाबतीत २०% दराने आयकर कपात करावी लागेल याची नोंद घेवून अशा सभासद/ग्राहकांना PAN घेणेसाठी प्रवृत्त करावे. जर PAN क्रमांक नसेल व २०% दराने आयकर कपात केली तर अशा खातेदारांना TDS सर्टिफिकेट देता येणार नाही व TDS रक्कम refund मिळणार नाही याबाबत खातेदारांना शाखा व्यवस्थापकांनी कल्पना द्यावी.

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD HEAD OFFICE

Annexure-III Unclaimed Deposit

अनक्लेमड डिपॉझीट (Unclaimed Deposit) च्या रक्कमा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग करणेबाबत–

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे दि.२७/०५/२०१४ रोजीचे परिपत्रकानुसार बँकांनी चालू / बचत खाती १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता Inoperative असणारी, रिकरींग व मुदत ठेवींच्याबाबतीत मुदत संपलेल्या तारखेपासून१० वर्ष किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या खात्यांच्या (Inoperative A/c's) व्याजासहीत रक्कमा तसेच इतर देणे रकमांना १० वर्षे किंवा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी होईल अशा रक्कमा व्याजासहीत पुढील महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत ठेवीदार प्रशिक्षण व जागरूकता निधी (DEAF) योजनेमध्ये रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करणेच्या आहेत.

१. रक्कम वर्ग करणेची पध्दत –

सदर रकमा मुख्य कार्यालयामार्फत रिझर्व्ह बँकेकडे "E kuber (CBS)" द्वारे वर्ग करावयाची आहे. जेव्हा बँका त्यांचेकडील अशा रक्कमा (१० वर्ष पूर्ण झालेल्या) वर्ग करणार असतील तेंव्हा त्यांनी त्यांना दिलेला DEAF Code Mention करणे आवश्यक आहे. सदर फॉर्म मध्ये एकूण खात्यांची संख्या व एकत्रीत रक्कम तसेच व्याजास पात्र असलेल्या ठेवी व व्याजास पात्र नसलेल्या ठेवी तसेच इतर रक्कमा नमुद करणे आवश्यक आहे.

२. रिटर्नस् –

फॉर्म नं.१ – बँकेने हे रिटर्न एकत्रीत रक्कम RBI ला वर्ग केली जाईल त्यादिवशी पाठविणेची आहे, हे सादर करताना एकूण रकमेपैकी व्याज देण्यास पात्र खाती व रक्कम, व्याजास अपात्र खाती व रक्कम व इतर जमा रक्कम अशा पध्दतीने माहिती पाठवावी. हे रिटर्न एकत्रीत पाठविले असले तरी बँकेने खातेदाराचे नाव, खाते नंबर, रक्कम तसेच त्यावरील होणारे व्याज, रक्कम वर्ग केल्याची तारीख इ. तसेच त्यासंबंधी इतर अनुषंगिक कागदपत्रे याचे बँकेने रेकॉर्ड ठेवणेचे आहे.

३. **फॉर्म नं.२ –** जेव्हा ग्राहक Unclaimed खात्याची मागणी करतो, तेव्हा त्या खात्याची मागणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे फॉर्म नं.२ प्रमाणे E-kuber द्वारे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत करावी लागते आणि २५ तारखेपर्यंत Hard copy पाठवावी लागते.

४. **बँकेने Unclaimed खात्यांचे रेकॉर्ड खालीलप्रमाणे ठेवण्याचे आहे.**

१) खातेदाराचे नाव–

२) खात्याचा प्रकार–

३) DEAF फंडास रक्कम वर्ग केल्याची तारीख व रक्कम–

४) खातेदारास रक्कम परत केल्याची तारीख व रक्कम–

५) DEAF फंडाकडून मागणी केलेला व्याजदर–

५. **दहा वर्ष व दहा वर्षावरील Unclaimed ठेवींची यादी EDP Department ने दर सहामाही बँकेच्या वेबसाईटवर अपडेट करणेची आहे.**

६. **फॉर्म नं.३ –** DEAF चे वार्षिक प्रमाणपत्र वैधानिक लेखापरिक्षकांकडून तपासून घेणेचे आहे.

७. **ऑडीट :–** बँका ज्या दिवशी रक्कम DEAF फंडात वर्ग करणार आहेत, त्यावेळी बँकेने प्रत्येक खातेदाराची स्वतंत्र माहिती ठेवणे आवश्यक आहे. सदरचे खाते व रक्कम बँकेचे कंकरंट ऑडीटर यांचेकडून तपासून घेणे आवश्यक आहे. DEAF A/c ला रक्कम वर्ग करणेपर्यंत होणारे व्याज खातेदाराच्या खाती जमा करणे आवश्यक असून ते ऑडीटर यांचेकडून तपासून घेणेचे आहे. तसेच RBI ला पाठविण्यात येणारी सर्व रिटर्न वेळेत व अचुक पाठविल्याचे प्रमाणपत्र वैधानिक लेखापरिक्षकांकडून वार्षिक घेवून RBI ला पाठविण्याचे आहे.

८. **अनक्लेमड डिपॉझीट (Unclaimed Deposit) बाबतीत शाखांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे.**

Unclaimed खातेंची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठविलेनंतर खाते Operative करणेची/Unclaimed खात्यांमधील रक्कमांची खातेदाराने मागणी केल्यानंतरची पध्दत खालीलप्रमाणे..

- खातेदार सदर रक्कमांची मागणी करणेस आलेनंतर खातेदाराकडून खाते Unclaim झालेचे कारणासह रक्कम मिळणेबाबत/खाते Operative करणेबाबत अर्ज घेणे,

THE PANDHARPUR URBAN CO. BANK LTD.
HEAD OFFICE

खातेदाराची KYC पूर्तता घेणे व KYC Documents मुळ कागदपत्रांबाबत Verify करणे.

- शाखेने खातेदाराचे अर्जाची प्रत, Verify केलेल्या KYC Documents च्या झेरॉक्स प्रती, खातेदाराचा सध्याचा फोटो, खाते पासबूक/मुदत ठेव पावतीची मुळ प्रत शाखेमध्ये व्यवस्थित जतन करून ठेवणे व त्यानंतर खाते Operative करणे तसेच Documents ऑडीट वेळी उपलब्ध करून देणे. वरील कागदपत्रांची पूर्तता झालेशिवाय खाते Operative करणेचे नाही.
- मुदत ठेव खातेंचे बाबतीत रक्कम अदा करताना/मुदत ठेव पावती नुतनीकरण करताना रिझर्व्ह बँकेकडे रक्कम पाठविलेल्या तारखेपासून रक्कम अदा/नुतनीकरण तारखेपर्यंत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या व्याजदरानुसार व्याज आकारणी करून एकत्रीत रक्कम अदा/नुतनीकरण करणेची आहे.

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

Annexure-IV CBS सिस्टीम मधून कायम ठेव, क्युम्युलिटीव्ह ठेव यांचे अॅटो रिन्युअल सुविधेबाबत

शाखा आणि ग्राहकांच्या मागणी नुसार मुदत ठेव (२४), क्युम्युलिटीव्ह ठेव (३२) यांचे अॅटो रिन्युअल सुविधेबाबत...

१) अॅटो रिन्युअल सुविधा ही फक्त कायम ठेव(२४) आणि क्युम्युलिटीव्ह ठेव(३२) या जीएल मधील सर्वच ठेवींना लागू आहे.

२) ठेवीदारांनी ज्या कालावधीसाठी मुदत ठेव पावती ठेवली आहे, त्याच कालावधीसाठी चालू असणाऱ्या व्याजदाराप्रमाणे ठेव पावती अॅटो रिन्युअल होईल.

उदा.ठेवीची मुदत १८० दिवसांची असेल तर अॅटो रिन्युअल करताना अॅटो रिन्युअल मुदत १८० दिवस एवढाच येईल.

***अॅटो रिन्युअल ठेवीच्या कालावधीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.**

३) ठेवीचे अॅटो रिन्युअल मुदत ठेव रकमेबाबत :-

- ज्या मुदत ठेव ठेवीची रक्कम खातेदारास मुदती नंतर व्याजासह रक्कम मिळणार आहे. अशी ठेव ही अॅटो रिन्युअल केल्यानंतर नवीन ठेव व्याजासहीत रिन्यु होईल.
- ज्या मुदत ठेव पावतीचे व्याज सेव्हींग, करंट इ. सारख्या खात्यात जमा होणार आहे, त्या ठेव पावत्या मुदतीनंतर मुळ रकमेने अॅटो रिन्युअल होतील.
- अॅटो रिन्युअल ठेवीचे व्याज रोख देता येणार नाही.
- क्युम्युलिटीव्ह ठेव पावत्या मॅच्युरिटी रकमेवर अॅटो रिन्युअल होतील.

४) व्याजदर आकारणी :- ठेव पावती ज्या कालावधीसाठी ठेवली आहे, त्या कालावधीतच मुदत संपल्यानंतर त्यावेळी जो व्याजदर असेल तो व्याजदर लागू होईल.

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD. HEAD OFFICE

-Annexure-V-

शाखाअंतर्गत ग्राहकांनी केलेल्या रोख व्यवहाराबाबत

सीबीएस प्रणाली मधून शाखाअंतर्गत रोखीने व्यवहार करणेबाबत नियमावली खालील प्रमाणे आहे.

१) बँकेचे खातेदार असलेले व्यक्तीसाठी रोखीने व्यवहार करणेबाबतचे नियम :-

- अशा खातेदारांना सर्व रोखीचे व्यवहार (जमा व नावे) करता येतील.
- जमेचे व नावेचे व्यवहार करताना शाखेने संबंधीत ग्राहक हा कोणत्या शाखेचा खातेदार आहे, त्याची खात्री करणेची आहे व आवश्यक वाटल्यास योग्य त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती घेण्याचे आहे.
- ज्या ग्राहकांच्या खात्यात रक्कम जमा किंवा नावे केली जाणार आहे, याबाबत व्यवहार संशयास्पद वाटल्यास संबंधीत ग्राहकाचे संमतीपत्र घ्यावयाचे आहे.

२) बँकेचे खातेदार नसलेल्या व्यक्तींनी करावयाच्या रोखीच्या व्यवहाराबाबत सुचना :-

- सर्व रोखीचे जमा व नावे व्यवहार करता येतील.
- व्यवहार करणाऱ्या संबंधीत व्यक्तीचे ओळखपत्रे (पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स इ.) व्हेरीफाय करून छप्तरी घ्यावे.
- कोणताही व्यवहार संशयास्पद वाटल्यास व्यवहार करू नये.
- ज्या ग्राहकाच्या खात्यात रक्कम जमा किंवा नावे केली जाणार आहे, त्याबाबत व्यवहार संशयास्पद वाटल्यास संबंधीत ग्राहकाचे संमतीपत्र घेणेचे आहे.

URBAN HEAD OFFICE THE LTD

-Annexure-VI-
अधिकारपत्र

मी श्री./सौ./श्रीमती. ______________________ रा. ______________

प्रस्तुत अधिकार पत्राद्वारे लिहुन देतो/देते की,

मी आपल्या बँकेच्या ________________ शाखेचा खातेदार असून माझ्या वैयक्तीक तथा माझ्या फर्मच्या नांवे आलेले धनादेश, ड्राफ्ट इ. माझ्या वैयक्तीक कारणास्तव आपल्या ____________ शाखेमध्ये प्रत्यक्ष हजर राहुन माझे खात्यामध्ये भरणे मला/आम्हास शक्य नाही. याकरीता मी/आम्ही माझे/आमच्या वतीने श्री./सौ./श्रीमती. ____________________ रा. ______________ मोबाईल क्र. ________________ यांना माझ्या/आमच्या अधिकृत व कायदेशीर प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले असून त्यांना माझे/आमचे/वैयक्तीक/फर्मचे नांवे असणारे धनादेश, ड्राफ्ट इ. माझे/आमच्या आपल्या बँकेमधील खाते क्र. ________________ मध्ये रोख रक्कम, धनादेश, ड्राफ्ट व इतर माध्यमातून जमा करणेचे कायदेशीर पुर्ण अधिकार दिले आहेत. त्यानुसार श्री./सौ./श्रीमती. ______ यांनी प्रस्तुत अधिकारपत्र स्विकृत केले असून त्याकरीता त्यांनी खाली सह्या केल्या आहेत.

प्रस्तुत अधिकारपत्राच्या आधारे जमा झालेली रक्कम, धनादेश, ड्राफ्ट इत्यादी व्यवहाराबाबत वैधता सिध्द करण्याची माझी पुर्ण जबाबदारी राहील व त्याचे बँकेस कसलीही तोषीश लागू देणार नाही अथवा त्याबद्दल कसलीही तक्रार करणार नाही.

प्रस्तुत अधिकारपत्र मी कायदेशीररित्या बँकेस कळवुन जोपर्यंत रद्द करत नाही, तोपर्यंत प्रस्तुत अधिकारपत्र कायदेशीररित्या अंमलात राहील.

येणेप्रमाणे अधिकारपत्र लिहुन दिले असे.

दिनांक :

सही–	सही–
प्रस्तुत अधिकारपत्र मी स्विकृत करतो	अधिकारपत्र लिहुन देणार
नांव–	नांव–

बँक अधिकाऱ्याचे नांव व सही–

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD HEAD OFFICE

-Annexure-VII-

ग्राहक सेवा व घ्यावयाची दक्षता

१) ग्राहकांनी चेकबुक आणि एटीएम कार्ड एकत्र ठेवणे. तसेच पासबुक, चेकबुक आणि एटीएम कार्ड सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

२) ग्राहकांनी कोऱ्या चेकरवर सही करून ठेवु नये. चेकने व्यवहार करताना क्रॉस आणि अकौंट पेई करून द्यावा.

३) ग्राहकांनी एटीएम कार्ड तपासून (पिन) तसेच इतर कोणतीही माहिती कोणालाही देवु नये.

४) ग्राहकांनी एटीएम कार्डचा पासवर्ड वेळोवेळी बदलने तसेच लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पासवर्ड कोठेही लिहुन ठेवु नये.

५) ग्राहकांनी चेकने व्यवहार करणेपुर्वी आपल्या खात्यावरील शिल्लक रक्कम तपासून घ्यावी. तसेच रक्कम रू.५०,०००/- व त्यावरील रकमेच्या वरील धनादेश कोणाला दिला असल्यास त्याबाबतची पुर्व कल्पना बँकेस द्यावी.

६) ग्राहकांनी चेकने व्यवहार करणेपुर्वी आपल्या खात्यातील रक्कम तपासून घ्यावी.

७) ग्राहकांनी वारस नोंद तसेच पत्ता आणि मोबाईल नंबर यात बदल झाल्यास शाखेत भेट देवुन संबंधीत माहिती बँकेस द्यावी.

८) ग्राहकाचे डिमांड ड्राफ्ट, ठेव पावती, चेकबुक, लॉकरची किल्ली, एटीएम कार्ड इ. सारखे गहाळ झाल्यास तावडतोब शाखेस कळविणे.

९) ग्राहकांनी कर्जावरील व्याज तसेच कर्ज हप्त्यासाठी स्टॅंडींग इन्स्ट्रक्शन या सुविधेचा वापर करावा.

१०) बँकेने उपलब्ध केलेल्या एटीएम, एनएसीएच, एन.ई.एफ.टी., आर.टी.जी.एस., एस.एम.एस. या सुविधेचा ग्राहकांनी वापर करावा.

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD. HEAD OFFICE

-Annexure-VIII-
स्वयंघोषणापत्र

मी ____________________ सेवक क्रमांक __________

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, दि. __________ रोजी __________

शाखेमध्ये रक्कम रू. __________ (अक्षरी रू. ____________________

__________) ची __________ ठेव केली असून सदर रक्कम ही माझ्या वैयक्तीक स्वरूपाची आहे.

ठिकाण :

दिनांक :

सेवकाची सही- __________

सेवकाचे नांव- __________

THE PANDHARPUR URBAN CO-OP BANK LTD. HEAD OFFICE

-Annexure-IX-
स्वयंघोषणापत्र

मी ______________________ सेवक क्रमांक ____________

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, माझे दि.पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि., पंढरपूर मध्ये खालील प्रमाणे मुदत ठेवी केलेल्या आहेत.

अ.नं.	शाखा	दिनांक	खाते प्रकार	खाते क्रमांक	रक्कम रू.
१					
२					
३					

वरील सर्व मुदत ठेवीची रक्कम ही माझे वैयक्तीक स्वरूपाची आहे.

ठिकाण :

दिनांक :

सेवकाची सही- ____________

सेवकाचे नांव- ____________

THE PANDHARPUR URBAN CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE

-Annexure-X-

स्वयंघोषणापत्र

मी ______________________ सेवक क्रमांक ____________

घोषणापत्राद्वारे असे जाहीर करतो/करते की, माझे दि.पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि., पंढरपूर मध्ये खालील प्रमाणे बचत ठेवी आहेत.

अ.नं.	शाखा	खाते क्रमांक
१		
२		
३		

वरील सर्व बचत ठेवीमध्ये जमा झालेली व होणारी रक्कम ही माझे वैयक्तीक स्वरूपाची असेल.

ठिकाण :

दिनांक :

सेवकाची सही- ______________

सेवकाचे नांव- ______________